**दिनांक:** २२/०९/२०२१

**सिंबायोसिस मराठी नाट्यमंडळ आयोजित**

# सिंबायोसिस करंडक - २०२१ (वर्ष ३७वे)

*(आंतरमहाविद्यालयीन मराठी नाट्यवाचन स्पर्धा)*

सन्माननीय प्राचार्य/प्राचार्या,
नमस्कार.

सालाबाद प्रमाणेच या वर्षीही आम्ही **सिंबायोसिस करंडक २०२१ - *आंतरमहाविद्यालयीन मराठी नाट्यवाचन स्पर्धेचे*** आयोजन करीत आहोत. आपल्या सुप्रतिष्ठित महाविद्यालयाने आजपर्यंत या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आम्हास सहकार्य केले आहे. तशाच सहकार्याची अपेक्षा आम्ही या वर्षीही आपणाकडून करीत आहोत.

यावर्षी स्पर्धेचे ३७वे वर्ष असून, कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव लक्षात घेऊन यंदा ही स्पर्धा ऑनलाईन स्वरुपामध्ये **दिनांक २६ आणि २७ ऑक्टोबर, २०२१** रोजी आयोजित केली आहे. स्पर्धेच्या मुळ स्वरुपामध्ये बदल केल्यामुळे तत्संबंधीच्या नवीन नियमांकडे विशेष लक्ष द्यावे ही विनंती. **या स्पर्धेसंबंधीची नवीन नियमावली व प्रवेश अर्ज सोबत जोडले आहेत.**

कृपया ही  माहिती आपल्या नाट्य विभाग प्रमुख व विद्यार्थी प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून द्यावी. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नेहमीप्रमाणे प्रोत्साहन द्यावे ही नम्र विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित

**डॉ. हृषिकेश सोमण**
प्राचार्य

**सहपत्रे:** *१. प्रवेश अर्ज नमुना २. स्पर्धेची नियमावली ३. लेखकांचे परवानगी पत्र नमुना.*

# <u>प्रवेश अर्ज</u>

**दिनांक:**      /    /२०२१

प्रति,
**मराठी नाट्य विभाग प्रमुख,**
सिंबायोसिस कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
सेनापती बापट मार्ग,
पुणे - ४११ ००४.

महोदय,

आपल्या महाविद्यालयाच्या वतीने आयोजित **सिंबायोसिस करंडक - २०२१: आंतरमहाविद्यालयीन मराठी नाट्यवाचन स्पर्धेमध्ये** आमच्या महाविद्यालयाचा संघ सहभाग घेऊ इच्छितो. सदर संघातील सर्व विद्यार्थी आमच्या महाविद्यालयातील नोंदणीकृत विद्यार्थी असून, स्पर्धेच्या नियमांचे पालन करून संयोजकांना संपूर्ण सहकार्य करतील.

**महाविद्यालयाचे नाव:** ................................................................................................................

**पत्ता:** ................................................................................................................................

**विद्यार्थी प्रतिनिधीचे नाव:** ........................................................ **मोबाइल क्रमांक:** ..............................

**नाटकाचे नाव:** .......................................................................................................................

**दिग्दर्शकाचे नाव:** ...................................................................................................................

**नाटकाचा अवधी:** ......................................

| अनुक्रमांक | संघातील कलाकारांची नावे | वर्ग आणि तुकडी | हजेरी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |
| ७ | | | |

सोबत प्रवेश मूल्य रुपये ७०० मात्र पाठवित आहोत. तरी त्याचा स्वीकार व्हावा व रीतसर पावती मिळावी, धन्यवाद.

**महाविद्यालयाचा शिक्का**                **प्राचार्य**

# सिंबायोसिस करंडक - २०२१

(आंतरमहाविद्यालयीन मराठी नाट्यवाचन स्पर्धा)

## स्पर्धेची नियमावली

१. कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव आणि तत्संबंधीचे नियम लक्षात घेऊन महाविद्यालयाने सदर **स्पर्धा एका फेरीतच घेण्याचे ठरविले आहे.**

२. स्पर्धेदिवशी सर्वांना एकत्र येणे शक्य नसल्याने **स्पर्धा ऑनलाईन** घेण्यात येईल.

३. प्रत्येक महाविद्यालयास **कमाल दोन** संघ पाठविता येतील.

४. प्रत्येक संघात **किमान दोन व कमाल सात** कलाकारांचा समावेश असावा.

५. प्रत्येक संघास **किमान पंधरा व कमाल वीस** मिनिटांचा अवधी दिला जाईल.

६. प्रत्येक संघास **रुपये ७००/- मात्र प्रवेश मूल्य** राहील. सदर प्रवेश मूल्य केवळ ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती Google Form द्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत **एकदा भरलेले प्रवेश मूल्य परत मिळणार नाही** याची कृपया नोंद घ्यावी.

७. इच्छुक स्पर्धक संघाने सिंबायोसिस कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (www.symbiosiscollege.edu.in) उपलब्ध करून दिलेल्या **Google Form द्वारे** प्रवेशा संदर्भात लागणारी **सर्व कागदपत्रे अपलोड करून दिनांक १६/१०/२०२१ पर्यंत** आपला प्रवेश निश्चित करावा. ***सदर Google Form यशस्वीपणे सादर करण्यासाठी पुढील कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहेत - प्रवेश अर्ज, प्रवेश मूल्य भरल्याचा Screenshot, हमीपत्र*** *- [सहभागी सर्व विद्यार्थ्यांची ओळखपत्रे / बोनाफाईडस / महाविद्यालयीन प्रवेश फी पावती],* ***लेखकांचे परवानगी पत्र इत्यादी.***

८. सदर स्पर्धा ऑनलाईन स्वरुपात होत असल्याने स्पर्धक संघाने **अभिलेखनाचे व्हिडीओ रेकॉर्डींग सादर केल्यानंतरच** त्या संघाचा समावेश निश्चित समजण्यात येईल. सदर व्हिडीओ रेकॉर्डींग करताना **सर्व सादरकर्ते एकत्र आहेत,** तसेच **महाविद्यालयाचे नाव असलेली पाटी, पात्रांच्या नावाच्या त्रिकोणी पाट्या एका फ्रेममध्ये येतील** याची दक्षता घ्यावी. (सादरिकरणाची जागा संघांनी आपल्या सोयीनुसार ठरवावी.)

९. सादरीकरण करताना **माईकचा वापर करता येणार नाही**. अभिलेखनाच्या रेकॉर्डींगसाठी वापरण्यात येणारा **कॅमेरा** सादरकर्त्यांच्या बैठकीपासून **योग्य अंतरावर** निश्चित करावा.

१०. अभिलेखन करताना **कॅमेरा संपूर्ण वेळ स्थिर राहील** अशी दक्षता घ्यावी.

११. अभिलेखनात कोणत्याही प्रकारची **दुरूस्ती *(editing)* आढळल्यास सदर संघाला बाद करण्यात** येईल.

१२. एकाच दिग्दर्शकाला दोन नाट्यवाचनांचे दिग्दर्शन करता येणार नाही. **दिग्दर्शकासहित संघाच्या कलाकारांची कमाल संख्या सात** असणे गरजेचे आहे.

१३. जर एका महाविद्यालयाने दोन संघ पाठविण्याचे योजले असेल तर त्या **दोन्ही संघामधील कलाकार वेगवेगळेच** असले पाहिजेत याची नोंद घ्यावी.

१४. मराठी एकांकिका, नाट्यप्रवेश, नाटक यांचाच समावेश अपेक्षित आहे.

१५. नाट्यवाचनात पार्श्वसंगीत, नेपथ्य व वेषभूषा वगैरेंचा वापर करता येणार नाही. सिंबायोसिस करंडक ही नाट्य वाचनाची स्पर्धा आहे. वातावरण निर्मितीसाठी तोंडाने विविध आवाज काढण्याची स्पर्धा नाही हे लक्षात घेऊन त्यांचे प्राबल्य नाट्य वाचनात नसावे ही विनंती.

१६. **नाट्यवाचनात आवाजाचा चढउतार, वाचिक अभिनय, भूमिकेची समज वगैरे बाबींना महत्व दिले जाईल**.

१७. **स्क्रिप्टची एक प्रत आणि अभिलेखने - व्हिडीओ रेकॉर्डींग** *(पेनड्राईवमध्ये Anti-virus Scanning करून)* संघाच्या विद्यार्थी प्रतिनिधीने व दिग्दर्शकाने सिंबायोसिस कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये **दिनांक १८ - २० ऑक्टोबर, २०२१ दरम्यान आणून सादर** करावीत. याबाबतचे सविस्तर वेळापत्रक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर **दिनांक १६ ऑक्टोबर, २०२१ रोजी** उपलब्ध केले जाईल.

१८. सदर अभिलेखने - व्हिडीओ रेकॉर्डीग, स्पर्धेच्या दिवशी परीक्षकांना दाखविण्यात येतील व त्याचे थेट प्रक्षेपण ***(Live Streaming)*** महाविद्यालयाच्या ***YouTube Channel*** वर करण्यात येईल.

१९. सर्व स्पर्धक संघाच्या **सादरिकरणाचे अंतिम वेळापत्रक आणि त्याच्या थेट प्रक्षेपणासंबंधीची आवश्यक सर्व माहिती** महाविद्यालयाकडून **दिनांक २२/१०/२०२१ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत** संकेतस्थळावर उपलब्ध केले जाईल.

२०. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

२१. स्पर्धेच्या नियमात अथवा कार्यक्रमात पूर्वसूचना देऊन वा न देता कोणताही बदल करण्याचा अधिकार संयोजकांकडे राखीव असेल.

२२. प्रथम व व्दितीय क्रमांक मिळालेल्या महाविद्यालयांनी **चालू शैक्षणिक वर्षात सहा महिन्यांच्या आत** करंडक संयोजकांकडे विद्यार्थीप्रतिनिधीं मार्फत स्वखर्चाने व स्वत:च्या जबाबदारीवर सुस्थितीत परत करावा.

**स्पर्धेच्या पारितोषिका संदर्भात**:

- **प्रथम सांघिक :** सिंबायोसिस करंडक व रोख पारितोषिक रुपये ५००१/-
- **व्दितीय सांघिक:** सिंबायोसिस करंडक व रोख पारितोषिक रुपये ४००१/-
- **तृतीय सांघिक:** सिंबायोसिस करंडक व रोख पारितोषिक रुपये ३००१/-
- **उत्तेजनार्थ सांघिक:** सिंबायोसिस करंडक व रोख पारितोषिक रुपये २००१/-
- **सर्वोत्तम वाचिक अभिनय:** पुरुष: प्रशस्तिपत्रक
- **सर्वोत्तम वाचिक अभिनय :** स्त्री: प्रशस्तिपत्रक
- **सर्वोत्तम दिग्दर्शन:** प्रशस्तिपत्रक
- **उत्तेजनार्थ दिग्दर्शन:** प्रशस्तिपत्रक

**अधिक माहितीसाठी संपर्क -** *विद्यार्थी प्रतिनिधी यशराज कदम: ८९५६७२१०९८*

# <u>लेखकांचे परवानगी पत्र</u>

मी, ..........................................................................................................................

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सिंबायोसिस कला व वाणिज्य महाविद्यालय आयोजित सिंबायोसिस करंडक - २०२१ आंतरमहाविद्यालयीन मराठी नाट्यवाचन स्पर्धेत, नाट्यवाचनासाठी मी लिहिलेला, ........................................................................................................ हस्तलेख, **<u>ऑनलाईन सादरिकरणाच्या माध्यमातून प्रेक्षकांना दाखविला जाणार आहे हे लक्षात घेऊन, सदर हस्तलेखाच्या सादरिकरणासाठी वापरण्यास परवानगी देत आहे.</u>**

**दिनांक:** / /२०२१

**लेखकाचे संपूर्ण नाव आणि स्वाक्षरी**